आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
बुधवार, दिनांक १९ जून २०२४

## ठळक बातम्या

- महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच भाजपचे नेतृत्त्व करतील- चंद्रशेखर बावनकुळे यांचं प्रतिपादन.
- नागपूरसह राज्याच्या सर्व जिल्हयांत पोलीस भरतीच्या चाचणी परीक्षेला सुरुवात.
- देशभरात आजपासून तीन जुलै पर्यंत विशेष सिकलसेल निर्मूलन मोहीम - नागपूर जिल्हयात एकुण 34,952 सिकलसेल वाहक.

आणि

- नागपूर मेट्रोच्या व्हॉट्सऍप तिकीट प्रणालीचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उदघाटन.

*****

चंद्रशेखर बावनकुळे

महाराष्ट्रात भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असून, तेच राज्याचं नेतृत्त्व करतील, अशी माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते आज नागपूर विमानतळावर वार्ताहरांशी बोलत होते. सर्व विधिमंडळ सदस्यांनी आणि प्रदेश भाजपने देवेंद्र फडणवीस यांना सरकारमध्येच राहून संघटनेला मदत करण्याची विनंती केली असल्याचं त्यांनी सांगितलं. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी दिलेल्या पाठबळाबद्दल धन्यवाद व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्रात भाजप जुलै महिन्यात धन्यवाद यात्रा काढणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी यावेळी दिली. महाराष्ट्रातील सर्व आमदार-खासदार, संघटनेतील सर्व पदाधिकारी जुलै महिन्यात धन्यवाद दौरा करणार आहेत. ज्या मतदारांकडे आम्ही मत मागण्यासाठी जाऊ त्यांना केन्द्र सरकारच्या नवीन योजना देखील पोहचवणार आहोत अशी माहिती त्यांनी दिली.

पोलीस भरती

नागपूर शहर आयुक्तालय इथं  पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ करिता २९ हजार नऊशे सत्यांशी  उमेदवार आहेत. तसेच नागपूर कारागृह शिपाई भरती २०२२-२०२३ साठीच्या २५५ पदांकरिता एकूण ५५ हजार २९७ उमेदवार चाचणी परीक्षेला आज पासून येत्या तीन दिवसात सामोरे जाणार आहेत. वाशिम जिल्हयातील शिपाई आणि चालक शिपाई या दोन पदाच्या **68** जागांसाठी आज  सकाळ पासून पोलीस मुख्यालयातील मैदानावर भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. भरती प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी **50** पोलीस अधिकारी आणि **250** कर्मचारी कार्यरत आहेत. चालक आणि  शिपाई या पदासाठी जिल्ह्यातील चार हजार **279** उमेदवारांनी अर्ज केले आहेत. ही भरती प्रक्रिया पुढील तीन दिवस चालणार आहे. अमरावती शहर आणि ग्रामीण  पोलीस, तसंच  एसआरपीएफच्या जवानांच्या रिक्त पदासाठी आज सकाळ पासून भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामध्ये एकूण ४९९ जागांसाठी ५२ हजार ४०१ उमेदवारांची मैदानी चाचणी होणार आहे. अमरावती शहर पोलीस आयुक्तालयात ७४ पदांसाठी, ग्रामीणमध्ये १९८२ पोलीस पदांसाठी आणि चालकाच्या ९ पदांसाठी आणि एसआरपीएफमध्ये २१८ जागांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे, अमरावती शहर आयुक्तालयात एकूण ७४ पोलीस पदांसाठी एकूण ४ हजार सातशे एकोणनव्वद उमेदवारांनी अर्ज केले आहेत.

जागतिक सिकलसेल दिवस

जागतिक सिकलसेल दिवस आज पाळण्यात येत आहे. देशभरात आजपासून तीन जुलै पर्यंत विशेष सिकलसेल निर्मूलन मोहीम राबवण्यात येत आहे. सर्वच शासकिय आरोग्य संस्थेमध्ये हा दिन तपासणी शिबीरे, कार्यशाळा, रॅली, गटसभा, ग्रामसभा इत्यादीचं आयोजन करण्यात येऊन साजरा करण्यात येत आहे. सिकलसेल हा आजार अनुवांषिक असल्यानं विवाहापूर्व समुपदेशनाव्दारे तो  आजार टाळता येतो. सिकलसेल वाहक आणि  ग्रस्त व्यक्तीनी आपआपसात विवाह टाळल्यास सदर आजाराचे निर्मुलन शक्य आहे. राष्ट्रीय सिकल सेल निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत नागपूर जिल्हयात पहिल्या टप्प्यांतर्गत सन **2009** पासून नियमित आणि विशेष गांव निहाय, शाळा निहाय आणि इतर स्तरावर लाभार्थ्यांची सिकल सेल आजाराची तपासणी करण्यात येत आहे. जिल्हयात एकुण **2** लक्ष सत्तेचाळीस हजार पाचशे तीन सिकलसेल आजाराच्या तापासण्या  करण्यात आलेल्या आहेत.  जिल्हयात एकुण **34,** हजार **952** सिकल सेल वाहक आणि **2** हजार **817** सिकल सेल ग्रस्त रुग्ण आहेत. यामध्ये सिकल सेल ग्रस्त रुग्णांचे

सिकल सेल क्रायसिस, तीव्र रक्तक्षय आणि  आवश्यक आरोग्य तपासणीसाठी नियमित पाठपुरवा करण्यात येत आहे. याबाबत सरकारी वैद्यकीय महाविद्यालय नागपूरच्या औषध वैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.अतुल राजकोंडावार यांनी अधिक माहिती दिली-

*विदर्भात आणि जवळचे जे काही प्रांत आहे त्याच्यामध्ये सिकलसेलचे प्रमाण जास्त आहे. आमच्या इथं सिकलसेल क्लीनिक ऑलरेडी आम्ही चालू आहे. त्या सिकलसेल क्लीनिकच्या अंतर्गत आम्ही पेशंटला, रुग्णांना निदान आणि ट्रीटमेंट करतो आणि गरज भासल्यास त्यांना ऍडमिट करतो. रोज जवळपास ३ ते ४ रुग्णांना आम्ही ऍडमिट करतो. कोणाला ब्लड लावावं लागत कोणाला अँटिबायोटिक्स द्यावं लागत. त्यांचे जॉईंट कमजोर होतात पुष्कळदा एव्हस्कुलर नेक्रोसिस पण होतो, म्हणजे जे जॉईंट आहे, तेही चांगले करावे लागतात त्याची पण व्यवस्था इथे आहे हा अनुवांशिक रोग असल्यामुळे न्याचरली त्यांच्या रिलेटिव्ह ची तपासणी करणं योग्य आहे.*

योग दिन

येत्या २१ तारखेला साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शशांकासनाची माहिती देणारी एक चित्रफित आज सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. या आसनाचा सराव करण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुंबईत मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात योगासन शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. या शिबिरास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित राहणार आहेत. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या  दक्षिण मध्य विभागीय सांस्कृतिक केंद्र आणि जनार्दन स्वामी योगभ्यासी मंडळ, रामनगर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानं "दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिना" निमित्त.21 जून रोजी सकाळी 6.30 वाजता योग दिन साजरा केला जाणार आहे. या वर्षी 10 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम "स्व आणि समाजासाठी योग" अशी आहे. जास्तीत जास्त संख्येने या मोफत कार्यक्रमाचा लाभ घ्यावा  असं आवाहन करण्यात आलं आहे. नागपूरच्या योग प्रशिक्षक मंगला पाटील यांनी योगासनांमध्ये डंबेल्स तसेच विविध वजनानं  भारी असलेल्या वस्तूं सहित योगासने सादर करून एक अनोखा प्रकार- आयर्न योगाची  प्रात्यक्षिके सादर केली. तरुण पिढीने योगासनाकडे वळून आपल्या शरीराला एक 'ऍथिलिटिक लुक'

देण्यासाठी अशा योगासनाचे प्रात्यक्षिक करणे आवश्यक आहे असं देखील त्यांनी सांगितलं.

धनंजय मुंडे

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा मंजुरीचा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. या संदर्भातल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सहा हजार ९५९ गावांचा समावेश असून, यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्य करणार आहे. शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणाऱ्या आणि विद्यापीठांनी विकसित केलेल्या छोट्या यंत्रांचा वापर होण्यासाठी सुद्धा या प्रकल्पातून प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.

शिक्षकांच्या समस्या

नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यात शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित असून या शिक्षकांनी समस्या निवारण सभेत तीव्र रोष व्यक्त केला. शिक्षकांची समस्या सोडविण्यास हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त करीत नागपूर विभागातील सर्व शिक्षणाधिकारी यांनी प्रलंबित समस्या तात्काळ निकाली न काढल्यास सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयाची चौकशी करा, असे निर्देश नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण उपसंचालक यांना बैठकीत दिले. 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर विभागातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ, सभा, शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्यासोबत धनवटे नॅशनल कॉलेज सभागृहात पार पडली

नागपूर मेट्रो

दररोज आणि नियमित पणे मेट्रो प्रवाश्याची संख्या वाढत असून या वाढत्या रायडरशिप मध्ये कॅशलेस व्यवहारला नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. याच शृखंलेत महा मेट्रोनं नवीन व्हॉट्सऍप तिकीट प्रणालीचं उदघाटन काल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी आमदार मोहन मते, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण

हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, मनपा आयुक्त अभिजित चौधरी उपस्थित होते. दरम्यान, या नवीन व्हॉट्सऍप तिकीट प्रणालीचा वापर करण्यासाठी नागपूर मेट्रो स्टेशनवरील **QR** कोड स्कॅन करा किंवा +918624888568 या क्रमांकावर **"Hi"** लिहून पाठवा एकदा तुम्ही **QR** कोड स्कॅन केल्यानंतर तुम्हाला अधिकृत **WhatsApp** खात्यावर निर्देशित केले जाईल. लिंक प्राप्त करण्यासाठी **"Hi"** म्हणा आणि बुकिंग प्रक्रिया पूर्ण करा. एकदा पेमेंट पूर्ण झाल्यावर, तुम्हाला व्हॉट्सअॅपवर **QR** कोडसह तिकीट मिळेल, जे प्रवेश करण्यासाठी गेटवर स्कॅन केल्या जाऊ शकेल.

गडकरी जनसंपर्क कार्यक्रम

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम येत्या ३०जून रोजी आयोजित करण्यात आला आहे. खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. यावेळी गडकरी नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रे जोडून आणाव्यात असं आवाहन करण्यात आलं आहे.

सायन्स जर्नलचे विमोचन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सायन्स जर्नलचे विमोचन कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी यांच्या हस्ते आज करण्यात आलं. कुलगुरू कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ.राजू हिवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने विज्ञान विषयातील संशोधनपर लेख असलेले पीअर पुनरावलोकन आणि संदर्भित जर्नल प्रत्येक वर्षी प्रकाशित केले जाते.

******